PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Nau mahine nau divas
Year: 2009

Song: Ya ga sakhyano chala ya ga
Lyricist: Shrirang Godbole

या गं सख्यांनो चला या गं सयांनो
आता डोहाळ तुळीचा झुला सजवूया
चंपा चमेली जाई मोगरा गुलाब जुई
फुलांनी आज हिची वाडी भरूया
वेल ही वाकली फळांनी लगडली
हिला परांच्या गादीवर हळू बसवा
किती गं लाजली लाजूनी हासली
हिच्या मनीचे डोहाळे सारे पुरवा
कुणी येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा
येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा

वसंत ऋतू आला
मोहरूनी आंबा गेला
कोकीळ कुहू कुहू गाई
चाहूल गोड लागे
कानात कुणी सांगे
होणार आता तू आई
केशरी बासुंदी गोड पेढा कंदी
तुला मुलगी हवी की हवा मुलगा
कुणी येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा

केशर लावा आता गोऱ्या हाताला हिच्या
माहेरी जाणार बाई
परतूनी येई जेव्हा
सासरीच्या अंगणा
युवराजा घेऊनी येई
मीठ मोहरीनी दृष्ट काढा हिची
मीठ मोहरीनी दृष्ट काढा हिची
आता जाई माहेरा गाडी सजवा
कुणी येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा
येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा

मनचं विचारा हिला
काय खावे वाटे तुला
बोला हिच्याशी गं कुणी
जोडीला तुझ्या आम्ही मिळूनी साऱ्याजणी
जीवाभावाच्या मैत्रिणी
चल गाऊ गाणी नको डोळा पाणी
चल गाऊ गाणी नको डोळा पाणी
तुझ्या ओंजळीत दिवा तेवे इवला
येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा
येणार येणार येणार येणार
येणार घरी एक नवा पाहुणा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*